गाव तिथे प्रतिनिधी नेमणे आहे..

दैनिक यश सिध्दी न्यूजसाठी महाराष्ट्रासह सोलापूर जिल्ह्यात गावत तिथे प्रतिनिधी नेमणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क : ९९२१९८८३५८

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

RNI NO. MAHMAR/2023/84162

YASH SIDDHI NEWS

● वर्ष १ ले ● अंक ८० वा ● शनिवार ०५ ऑगस्ट २०२३ ● पाने ४ ● किंमत ४ रु/-

| * Volume 1 | Issue 80 | Date : 05/08/2023 | blow : Saturday | Page 4 | Price 4


## राहुल गांधींच्या शिक्षेला स्थगिती

### सर्वोच्च न्यायालयाचा मोठा दिलासा

नवी दिल्ली : काँग्रेस नेते राहुल गांधींना मोठा दिलासा मिळाला असून मोदी आडनावाच्या मानहाणीप्रकरणी त्यांना दोषी ठरवण्याच्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयाने स्थगिती दिली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे राहुल गांधी यांना त्यांची खासदारकी पुन्हा मिळणार आहे. मोदी आडनावाची मानहानी केल्याप्रकरणी राहुल गांधी यांना गुजरातच्या न्यायालयाने दोन वर्षाची शिक्षा सुनावली होती. त्यानंतर लोकसभा सचिवालयाने राहुल गांधी यांची खासदारकी रद्द केली होती. या निर्णयाच्या विरोधात राहुल गांधी यांनी सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. सर्वोच्च न्यायालयाने आता राहुल गांधी यांच्या दोषी असण्याच्या निर्णयाला स्थगिती दिली आहे. त्यामुळे राहुल गांधी यांना आता त्यांची खासदारकी पुन्हा मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. सर्वोच्च न्यायालयाने या शिक्षेला स्थगिती देताना म्हटलं आहे की, आडनावाच्या बदनामीवर शिक्षा सुनावताना सर्वाधिक म्हणजे दोन वर्षांची शिक्षा का सुनावली. त्यांची खासदारकी रद्द व्हावी म्हणून त्यांना ही शिक्षा सुनावली होती का? त्यापैकी एका दिवसाची शिक्षा जरी कमी असती तर त्यांची खासदारकी रद्द करता आली नसती. त्यामुळे या प्रकरणातील जास्तीत जास्त म्हणजे दोन वर्षांची शिक्षा सुनावली हे हेतूपुरस्पर होतं का?

संसदेचे पावसाळी अधिवेशन सुरू असून विरोधकांनी मोदी सरकारवर अविश्वास प्रस्ताव आणला आहे. अशा वेळी राहुल गांधी यांना त्यांची खासदारकी परत । पान २ वर



**प्रियांका गांधी यांनी ट्वीट करत सर्वोच्च न्यायालयाचे आभार मानले आहेत. त्यांनी त्यांच्या ट्वीटमध्ये म्हटलं आहे की, गौतम बुद्धांनी म्हटल्याप्रमाणे, तीन गोष्टी जास्त काळ लपून राहू शकत नाहीत त्या म्हणजे सूर्य, चंद्र आणि सत्य. सर्वोच्च न्यायालायने न्याय्य निर्णय दिल्याबद्दल त्यांचे आभार. सत्यमेव जयते.**

## साखरेच्या आंतरराष्ट्रीय किमतीत विक्रमी वाढ, देशात मात्र साखरेचे किरकोळ दर स्थिर : केंद्र सरकार

नवी दिल्ली : साखरेच्या आंतरराष्ट्रीय किमतीत विक्रमी वाढ होऊनही देशातील साखरेचे किरकोळ दर स्थिर ठेवल्याची माहिती केंद्र सरकारच्या वतीनं देण्यात आली आहे. एप्रिल ते मे २०२३ मध्ये आंतरराष्ट्रीय साखरेच्या किमतींनी दशकातील सर्वोच्च पातळी गाठली होती. तरीही, साखरेच्या देशांतर्गत किमतींमध्ये सुमारे ३ टक्के इतकी नाममात्र दरवाढ झाली आहे. ही दरवाढ ऊसाच्या रास्त आणि लाभदायक किंमत वाढीशी सुसंगत असल्याचं केंद्रानं म्हटलंय. केंद्र सरकार देशातील साखरेच्या किरकोळ किमती स्थिर ठेवण्यात यशस्वी ठरल्याचे सांगण्यात आले.



आंतरराष्ट्रीय बाजारात साखरेच्या किमती भारतातील साखरेच्या किंमतीपेक्षा जवळपास ५० टक्क्यांनी जास्त आहेत. देशातील साखरेची सरासरी किरकोळ किंमत सुमारे ४३ रुपये प्रति किलो आहे. ती केवळ याच मर्यादेतच राहण्याची शक्यता आहे. गेल्या १० वर्षांत देशात साखरेच्या किमतीत २ टक्क्यांहून कमी वार्षिक दरवाढ झाली आहे. सरकारच्या व्यावहारिक धोरणात्मक हस्तक्षेपामुळं देशांतर्गत किमती थोडी दरवाढ नोंदवत स्थिर राहिल्या आहेत. सरकारने वेळीच हस्तक्षेप केल्याने साखर क्षेत्र संकटातून बाहेर आले आहे. साखर क्षेत्राची भक्कम मूलभूत तत्त्वे आणि देशात ऊस तसेच साखरेचे पुरेसे उत्पादन यामुळं प्रत्येक भारतीय ग्राहकाला साखर सहज उपलब्ध होईल हे सुनिश्चित झाले आहे.

चालू साखर हंगामात (ऑक्टो ते सप्टेंबर) २०२२-२३, इथेनॉल उत्पादनासाठी सुमारे ४३ लाख मेट्रिक टन ऊस वापरल्यानंतरही भारतात सुमारे ३३० लाख । पान २ वर

## नितीन देसाई आत्महत्या प्रकरणात ५ जणांविरोधात पहिला गुन्हा दाखल

मुंबई : बॉलीवूडचे प्रसिद्ध कला दिग्दर्शक नितीन देसाई यांनी २ ऑगस्ट रोजी गळफास घेऊन आत्महत्या केली. त्यांच्या पार्थिवावर आज अंत्यसंस्कार केले जाणार आहेत. आता नितीन देसाई आत्महत्या प्रकरणात मोठी अपडेट आली आहे. देसाईंच्या आत्महत्या प्रकरणात ५ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. नितीन यांच्या पत्नी नेहा देसाई यांनी खालापूर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्या तक्रारीच्या आधारे खालापूर पोलीस ठाण्यात पहिला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ईसीएल फायनान्स कंपनी व एडलवाईस ग्रुपचे पदाधिकारी अशा एकूण ५ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. कर्ज प्रकरणात वारंवार तगादा लावून आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. नितीन देसाई यांच्या पत्नी नेहा देसाई यांच्या तक्रारीवरून पाचही जणांविरोधात कलम ३०६, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, नितीन देसाई यांच्या कंपनीवर कर्ज होतं. नोव्हेंबर २०१६ मध्ये नितीन देसाई यांच्या कंपनीने एडलवाईस एआरसीकडून १५० कोटी रुपयांचे कर्ज घेतले होते. त्यानंतर फेब्रुवारी २०१८ मध्ये ईसीएल फायनान्सकडून पुन्हा अतिरिक्त ३५ कोटी रुपयांचे कर्ज त्यांनी घेतले. जानेवारी २०२० पासून कर्जाचे हप्ते थकू लागले. त्यांच्या कंपनीवर एकूण २५२ कोटी रुपयांची थकबाकी होती. त्यासाठी जुलै २०२२ मध्ये एनसीएलटीकडे याचिका करण्यात आली होती, असं एडलवाईस एआरसीने जाहीर केलेल्या पत्रकात म्हटलं होतं.

## महाराष्ट्र विधानसभेचं हिवाळी अधिवेशन ७ डिसेंबरपासून!

### उपमुख्यमंत्री अजित पवार यांची घोषणा



मुंबई : १७ जुलैला आम्ही एकनाथ शिंदेंच्या नेतृत्वात सत्ताधारी पक्ष आंदोलनाला सामोरा गेला. आज त्याचा शेवट झाला, यापुढचं अधिवेशन ७ डिसेंबर २०२३ ला आपण महापरिनिर्वाण दिन झाल्यानंतर घेतला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यपालांशी बोलून हा निर्णय घेतला आहे ही घोषणा अजित पवार यांनी केली.

या अधिवेशनात जेवढी बिलं सत्ताधारी पक्षाने आणली त्यातली जवळपास सर्व बिलं आम्ही मंजूर केली. माथाडी कामगारांच्या संदर्भातल्या बिलांबद्दल सगळ्यांची मतमतांतरं होती. असं जेव्हा होतं तेव्हा संयुक्त समितीकडे ते विधेयक पाठवलं जातं. आता आपण सुरेश खाडेंच्या नेतृत्वात एक समिती तयार केली आहे. माथाडी कामगारांविषयीच्या। पान २ वर

## न भूतो न भविष्यति; २१ ते २३ जानेवारी दरम्यान होणार अयोध्येत श्रीरामाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना

नवी दिल्ली: अयोध्येतील राम मंदिराचं बांधकाम वेगानं सुरू आहे. अयोध्यातील मंदिरातील श्रीरामाच्या मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठेची तारीख समोर आली आहे. पुढील वर्षी २१ ते २३ जानेवारी दरम्यान अयोध्येतील मंदिरातील गर्भगृहात श्रीरामाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात येणार आहे. श्री रामजन्मभूमी तीर्थ क्षेत्र ट्रस्टने पंतप्रधान नरेंद्र मोदींना ट्रस्टतर्फे निमंत्रण देण्यात आले आहे. तसेच त्यांची वेळ देखील मागितली आहे, ही माहिती राम मंदिर प्रतिष्ठानच्या विश्वस्तांनी ही माहिची दिली हे. अयोध्यातील मंदिरातील श्रीरामाच्या



मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठापना ही पुढील वर्षी जानेवारी महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यात करण्यात येणार आहे. प्रभू श्रीरामाच्या मूर्तीची प्रतिष्ठापना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. श्रीरामाच्या मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठापनेसाठी २१,२२ आणि २३ जानेवारी या तीन तारखा निश्चित करण्यात आल्या आहे, अशी माहिती श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र ट्रस्टचे सरचिटणीस चंपत राय यांनी पीटीआयशी बोलताना दिली आहे.

अयोध्येत हा सोहळा पार पडणर असून संपूर्ण सोहळा अराजकीय असणार आहे. या सोहळ्यासाठी विविध पक्षांच्या नेत्यांना निमंत्रण देण्यात येणर आहे. याशिवाय त्या कार्यक्रमासाठी कोणताही स्टेज बनवला जाणार नाही. या सोहळ्यासाठी २५००० संताना आमंत्रित करण्याचे नियोजन असल्याची माहिती। पान २ वर

## पीएम् मोदींच्या हस्ते एकाच वेळी ५०८ रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकास प्रकल्पांचे भूमीपूजन

### राज्यातील ४४ स्थानकांचा समावेश

मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते एकाच वेळी ५०८ रेल्वे स्थानकाच्या पुनर्विकास प्रकल्पांचे भूमीपूजन करणार आहे. दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून पंतप्रधान मोदी या पुनर्विकास प्रकल्पांची पायाभरणी करणार आहेत. पुनर्विकास करण्यात येणाऱ्या देशभरातील ५०८ स्थानकांमध्ये महाराष्ट्रातील ४४ स्थानकांचा समावेश आहे. त्यात मुंबईतील १५ रेल्वे स्थानकांचा समावेश आहे. रेल्वे स्थानक पुनर्विकासात महाराष्ट्रातील एकूण १२३ रेल्वे स्थानकांचा समावेश आहे. त्यापैकी ४४ स्थानकांच्या प्रकल्पाची पायाभरणी रविवारी, ६ ऑगस्ट रोजी होणार आहे.



सार्वजनिक वाहतुकीचे माध्यम म्हणून देशभरातील नागरिकांची रेल्वेला पसंती असल्याचे लक्षात घेऊन सरकारने रेल्वे स्थानकांमध्ये जागतिक दर्जाच्या सुविधा पुरवण्याच्या आवश्यकतेवर भर दिला आहे. देशभरातील १३०९ स्थानकांच्या । पान २ वर

## केदारनाथमध्ये मोठी दुर्घटना! यात्रेच्या मुख्य मार्गावर दरड कोसळली, १० हून अधिक लोक बेपत्ता



नवी दिल्ली : उत्तराखंडमध्ये मुसळधार पावसामुळे दरड कोसळून मोठी दुर्घटना घडली आहे. केदारनाथ यात्रेचा मुख्य मार्ग असलेल्या गौरीकुंड येथे भूस्खलन झालं आहे. दरड कोसळल्याने येथे १० ते १२ जण बेपत्ता असल्याची माहिती समोर येत आहे. रुद्रप्रयाग आपत्ती व्यवस्थापन अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहिती नुसार, भूस्खलनात १० ते १२ लोक गाडले जाण्याची किंवा वाहून गेल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

मुसळधार पावसामुळे उत्तराखंडमध्ये भूस्खलन झालं आहे. उत्तराखंडमधील रुद्रप्रयागमधील केदारनाथ यात्रेच्या मुख्य थांबा असलेल्या गौरीकुंड येथे दरड कोसळून मोठी दुर्घटना घडली आहे. ढिगारा खाली कोसळल्याने अनेक दुकाने वाहून गेली. ज्यामध्ये १०-१२ लोक वाहून गेल्याची किंवा गाडल्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. डऊॠकडून या ठिकाणी शोध आणि बचावकार्य राबवण्यात येत असून नागरिकांना शोधण्याचा प्रयत्न सुरु आहे.

ही दुर्घटना गुरुवारी रात्री दीड वाजताच्या सुमारास घडल्याची माहिती समोर आली आहे. गौरीकुंड दात पुलियाजवळ दरड कोसळली । पान २ वर

## वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांत मृत्यू झाल्यास व्यक्तीच्या वारसांना आता मिळणार २५ लाख रुपयांचे अर्थसहाय्य

### वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांची विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहात माहिती

मुंबईः वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे माणसाचा मृत्यू झाल्यास, कायम अपंगत्व आल्यास, गंभीर आणि किरकोळ जखमी झाल्यास शासनाकडून देण्यात येणाऱ्या अर्थसाह्यात भरीव वाढ करण्यात आली असून यापुढे अशा दुर्घटनेत व्यक्ती मृत पावल्यास त्याच्या वारसांना २५ लाख रुपये अर्थसहाय्य देण्यात येणार आहे. यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असल्याचे निवेदन वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी आज विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात केले.

राज्यात वन्य प्राण्यांच्या संख्येत वाढ झालेली असून मानव - वन्यजीव संघर्षामध्येही वाढ होत आहे. हा संघर्ष कमी करण्यासाठी वन विभागाच्या माध्यमातून प्रबोधन करण्यात येत असून डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन-विकास योजने अंतर्गत स्थानिक जनतेचे वनावरील अवलंबन कमी करण्याचा प्रयत्न वनविभागाकडून सुरू आहे. मनुष्यहानीच्या वाढत्या घटनांमुळे कुटुंबातील व्यक्तीच्या मृत्यूमुळे, व्यक्तीला गंभीर अपंगत्व आल्यामुळे त्या कुटुंबाचे मोठे नुकसान होते. याची दखल शासनाने संवेदनशीलपणे घेतली असल्याचे मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी सांगितले. यासंदर्भात शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असून



त्यानुसार व्यक्तीला कायम अपंगत्व आल्यास ७ लाख ५० हजार रुपये, व्यक्ती गंभीररित्या जखमी झाल्यास ५ लाख रुपये आणि किरकोळ जखमी झाल्यास त्याला औषधोपचारासाठी येणारा खर्च देण्यात येणार आहे. दिनांक ०३ ऑगस्ट, २०२३ रोजी हा निर्णय निर्गमित केल्याचे त्यांनी सांगितले.

मंत्री मुनगंटीवार म्हणाले की, सध्याच्या आर्थिक तरतूदीत वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात मृत्यू, कायमस्वरुपी अपंगत्व, गंभीर जखमी व किरकोळ जखमी व्यक्तीला द्यावयाची आर्थिक मदत त्या मानाने कमी असल्याबाबत व त्यामध्ये वाढ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. लोकप्रतिनिधींकडून आर्थिक सहाय्यामध्ये वाढ करण्याबाबत मागणीही होती. त्या अनुषंगाने हा निर्णय घेण्यात आला. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यामुळे व्यक्ती मृत्यू पावल्यास त्याच्या वारसांना २५ लाख रुपये आर्थिक सहकार्य करण्याच्या निर्णयामुळे अनेक कुटुंबांना दिलासा मिळणार आहे. किरकोळ जखमी झाल्यास त्याला औषधोपचारासाठी येणार खर्च देण्यात येणार आहे. मात्र, खाजगी रुग्णालयात । पान २ वर

## जगदगुरू पंचाचार्य प्रशालेत पोषण शक्ती निर्माण अंतर्गत मार्गदर्शन संपन्न

अक्कलकोट/प्रतिनिधीः गौडगाव बु!! येथील श्री गुरु सिद्धमल्लेश्वर कल्याण केंद्र संचलित श्री जगद्गुरु पंचाचार्य प्रशालेत प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण करण्याकरिता तालुका कृषी अधिकारी अक्कलकोट आयोजित कार्यशाळेत शिवानंद देगील मंडल अधिकारी अक्कलकोट यांच्या मार्गदर्शनाखाली अभिषेक जोजन कृषी पर्यवेक्षक वागदरी,आनंद कांबळे कृषी सहाय्यक, चिदानंद खोबण कृषी सहाय्यक,यांच्या उपस्थितीत आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्षानिमित्त प्रशालेतील विद्यार्थ्यांमध्ये




तृणधान्याबाबत जागरूकता निर्माण व्हावी त्यांच्या दैनंदिन आहारात तृणधान्याच्या वापर व त्याचे फायदे तसेच तृणधान्य व कडधान्य यातील फरक याविषयी मार्गदर्शन करण्यात आले .प्रारंभी प्रशालेचे मुख्याध्यापक कल्याणी देशेट्टी यांनी सर्व मान्यवरांचे स्वागत केले यावेळी लाडप्पा शिंदे .सुभाष घोडके.पोपठ सोनकांबळे व बहुसंख्या विद्यार्थी उपस्थित होते.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## * सुविचार *

आधी माणूस वाचा, मग पुस्तक वाचा.

## संपादकीय

### भूतकाळातील दिरंगाई..

लोकांच्या मनात माळीण, तळिये आणि अशाच अनेक दुर्दैवी घटनांच्या वेदनादायी आठवणी जाग्या झाल्या. इर्शाळवाडी घटना नेमकी का घडली? मृत्यूचा आकडा किती? अशा अनेक प्रश्नांची उत्तरे अजून त्या लोकांना मिळायची आहेत. ती मिळतील का, याची चिंता लोकांना सतावत असावी. कारण इर्शाळवाडी डोंगराच्या उदरात गडप झाली आणि माध्यमांनी भूतकाळात घडलेल्या तशाच काही घटनांचा आढावा घेतला. अशा घटनांच्या बाबतीत सरकारचे घोडे नेहमीच वरातीमागून धावते हे राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीदेखील मान्य केले. या घटनेमुळे राज्यातील विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे पालक अस्वस्थ झाले असतील तर नवल नाही. राज्यातील अनेक शाळांच्या इमारती पडिक आणि कधीही कोसळतील अशा अवस्थेत उभ्या आहेत. त्यांचे वृत्त अधूनमधून माध्यमात प्रसिध्द होत असते. संरक्षण भिंती जमीनदोस्त होतात. विद्यार्थ्यांना बसायला जागा नसते. दोन-तीन इयत्तांचे वर्ग एकाच खोलीत भरतात. अशा शाळांमध्ये मुलांना पाठवताना पालक नक्कीच अस्वस्थ होत सतील.पण त्यांचा नाईलाज होत असेल. इमारतीच्या जीर्ण अवस्थेमुळे पाल्याला शाळेत पाठवले नाही तर शिक्षणाचे नुकसान आणि पाठवले तर जीवाची भीती, अशा कात्रीत पालक सापडत असावेत. अनेक सरकारी शिक्षक चौकटीबाहेर जाऊन काम करतात. विद्यार्थ्यांना आनंददायी शिक्षण मिळावे म्हणून अनेक प्रयोग करतात. अशाही परिस्थितीत मुलांना शाळेत पाठवण्याची, विद्यार्थ्यांची शिकण्याची आणि शिक्षकांमधील शिकवण्याची वृत्ती टिकून आहे हे त्यांनी शासनावर केलेले उपकारच नाहीत का? शाळा इमारतींच्या बांधकामांचे परीक्षण करण्याचे आदेश वेळोवेळी दिले जातात. पण त्याचे पुढे काय होते? असे अनेक आदेश फक्त कागदावरच अस्तित्वात असतात हेच वास्तव आहे. इर्शाळवाडीसारखी एखादी दुर्घटना घडली की झोपी गेलेले प्रशासन आणि समाजालाही तात्पुरती खडबडून जाग आल्यासारखी वाटते. आता परिस्थिती खरेच बदलेल अशा आशा माणसांना वाटू लागतात. पण थोडा काळ गेला की पुन्हा सगळेच सोयीस्कररीत्या झोपेचे पांघरूण ओढत असावेत का? याविषयीची माहिती 'यूडायस'वर भरलेली असते असे सांगितले जाते. यूडायस हे केंद्र सरकारने विकसित केलेले एक पोर्टल आहे. त्याचा आढावा घेतला जातो का? दुर्घटना घडल्यानंतरच शासनाला का जाग येते? त्यामुळे भूतकाळातील दिरंगाईचे परिमार्जन होऊ शकेल.

## मानवी स्वातंत्र्याचे संरक्षण कोण करेल?

कुंपणानेच शेत खाल्ल तर विश्वास ठेवायचा कोणावर? हा प्रश्न निर्माण होतो. शेतकरी स्वतः च्या शेतातील पिकांचे संरक्षण होण्यासाठी शेताच्या भोवताल कुंपनाचे आवर करत असतात. मग ते कुंपन कशाने ही बनवले असले तरी मुळ मुद्दा असतो शेतातील पिकांचे संरक्षण. परंतु जर कुंपनच शेत खात असेल, जर कुंपनच पिकांची नासाडी करत असेल तर शेतकऱ्यांने दोष कोणाला द्यायचा? हा महत्वाचा प्रश्न उपस्थित राहतो. शेतकऱ्यांच्या कुंपनासारखीच गोष्ट आज देशात घडत आहे. ज्यांनी राष्ट्र, राष्ट्रीय प्रतिके व राष्ट्रातील जनता यांचे संरक्षण करून त्यांच्या सर्वांगीण विकासाची जबाबदारी घ्यायला पाहिजे तेच लोक देशाला पोखरून कमकुवत करत आहेत. म्हणून देशामध्ये अनेक समस्यांचे थैमान माजले आहे. देशाची राज्याची जबाबदारी ज्यांच्या वर आहे तेच लोक देश व राज्याला खात असतील तर सर्वसामान्य जनतेला काय मिळणार म्हणून सर्वात जास्त समस्या ह्या सर्वसामान्य जनतेच्या समोर आहेत. भारतामध्ये अन्न, वस्त्र, निवारा, आरोग्य व शिक्षण या मुलभूत गरजे विषयी समस्या तर आहेत. परंतु अजून दोन महत्वाच्या समस्या आहेत त्या म्हणजे समता आणि सामाजिक न्याय. समता आणि सामाजिक न्याय ह्या व्यापक व मानसाला विकासाच्या शिखरावर नेणाऱ्या संकल्पना भारतीय संविधानात असुनही त्यावर अंमलबजावणी केली जात म्हणून अनेक समस्या निर्माण झाल्या आहेत. ब्रिटीश पंधरा ऑगस्ट एकोनीससे सत्तेचाळीस ला भारत देश सोडून गेले म्हणजे आपण त्याला स्वातंत्र्य दिन म्हणतो. पंधरा ऑगस्ट ला देशाला परकीय सत्तेपासून स्वातंत्र्य मिळाले, ब्रिटिश देश सोडून निघून गेले. ब्रिटीशांनी देश सोडून निघून जावे आणि भारतीय लोकांच्या हाती सत्ता द्यावी या साठी भगतसिंग, सुखदेव, राजगुरू, सुभाषचंद्र बोस, अशपाकुल्ला खान यांनी जिवाचे बलिदान दिले व यांच्या बलिदानाला यश मिळाले आणि ब्रिटिशांनी देश सोडला. राजकीय दृष्टीने, सत्तेच्या दृष्टीने आपल्याला पंधरा ऑगस्ट ला स्वातंत्र्य मिळून देश स्वातंत्र्य झाला. परंतु देशातील जनता हजारो वर्षापासून वर्णाव्यवस्थेने धार्मिक ग्रंथाच्या आधारे गुलाम बनवून ठेवले होते. आणि ह्या गुलामीतून भारतीय लोकांना स्वातंत्र्य मिळवून देणे आव्हानाचे काम होते. याच गुलामगिरी मुळे जातियता, विषमता, अस्पृश्यता, अंधश्रद्धा, पाखंड यांचा जन्म झाला. समता, बंधुता, न्याय, स्वातंत्र्य, शिक्षण अशा सर्वच बाबी धार्मिक ग्रंथानी व उच्च वर्णीय लोकांनी नाकारुन केवळ लोकांना अज्ञानी ठेऊन त्यांच्या टाळूवरचे लोणी खाऊन स्वतः ला विद्वान समजणाऱ्या वर्गाची गुलामगिरीतुन स्वातंत्र्य मिळवून देणे अवघड असताना. २६ जानेवारी १९५० पासून देशातील धर्मग्रंथ व वर्णाने लादलेली गुलामीतुन स्वातंत्र्य मिळाले. म्हणजेच लोकांच्या स्वांतत्र्याचा दिवस २६ जानेवारी व देशाच्या स्वातंत्र्याचा दिवस हा १५ पंधरा ऑगस्ट आहे. म्हणून आम्ही दोन्ही दिवस अगदी धुमधडाक्यात साजरे करतो. मानवी स्वातंत्र्यानूसार देशातील प्रत्येक नागरिकांना विचार व्यक्त करण्याचे, म्हणजे मत मांडणे, सभा घेणे याचे स्वातंत्र्य, देशात भ्रमण करणे, सार्वजनिक संपत्तीचा वापर करणे जसे बस, रेल्वे, शिक्षण संस्था, इतर सार्वजनिक ठिकाणी जात धर्म वर्ण पंथा नुसार भेद न करणे अशा प्रकारचे मुलभूत हक्क भारतीय संविधानाने दिले व जनतेला स्वातंत्र्य मिळवून दिले. जनतेच्या मुलभूत हक्क अधिकाराचे संरक्षण करण्यासाठी आपल्याकडे लोकशाही पद्धती स्विकारून कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ व न्यायपालिका अशा व्यवस्थेची निर्मीती करून माणसाच्या स्वातत्र्यांची हमी भारतीय संविधानाने जनतेला दिली आहे. स्वातंत्र्य अर्थात स्वैराचार मुळीच नाही. जसे मत व्यक्त करण्याचे, सभा घेण्याचे स्वातंत्र्य आहे तर मनात येईल ते मुळीच बोलता येत नाही. मत व्यक्त करताना बोलण्यातुनच कोणत्याही प्रकारची तेढ, वाद निर्माण होईल, राष्ट्र व राष्ट्रीय प्रतीकांचा अवमान होईल, बोलण्यातुन दंगल होईल असे बोलता येणार नाही. परंतु चुकिच्या गोष्टींना, सरकारच्या ध्येयधोरनांना व तत्सम बाबीं बद्दल मत मांडण्याचा अधिकार संविधानाने कोणत्याही प्रकारचा भेद न करता प्रत्येक भारतीय नागरिकांना दिला आहे. मनोहर कुलकर्णी नावाचा वयोवृद्ध व्यक्ती महाराष्ट्रात वेगवेगळ्या ठिकाणी कार्यक्रम घेऊन खोटा इतिहास सांगुन तरुणांची माथी धर्मांधता पेरत आहे. अनेक गुन्हे दाखल असणाऱ्या व्यक्तीला पुर्ण महाराष्ट्र सभा घेऊ दिल्या जातात. भिमाकोरेगाव प्रकरणा पासून अनेक वादग्रस्त विधाने करून डोक्यात मेंदु व देशाप्रती आपुलकी नसल्याचे अनेक उदाहरण मनोहर कुलकर्णी यांनी स्वतः सिद्ध करून दिले. कुलकर्णी च्या शेतातील आंबे खाल्याने मुलगा होतो असे विधान करून महिलांचा अवमान तर केलाच परंतु विज्ञानाला पायाखाली तुडवले. राष्ट्रगीत, राष्ट्रध्वज न मानणारा मनोहर कुलकर्णी राष्ट्रद्रोही नाही का?

राष्ट्रद्रोही लोकांना अटक करून तुरुंगात डांबुन ठेवून त्याचे नागरिकत्व नष्ट करण्याचे काम कोणाचे आहे. जो राष्ट्रध्वज फडकवूच नका म्हणतो आणि ठिकठिकाणी सभा घेतो अशा देशद्रोही व्यक्तीला सभा कशा घेऊ दिल्या जातात? जो व्यक्ती गांधी, नेहरु व महात्मा फुले यांच्या बद्दल तुच्छ विधान करतो आणि वैचारिक व पुरोगामी लोकांना चिड निर्माण करून देतो अशा कुलकर्णी ला सरकार अटक का करत नाही? एखाद्या व्यक्तीमुळे सामाजिक व धार्मिक तेढ निर्माण होऊन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होत असेल तर सरकार त्याला अटक करू शकते मग कुलकर्णी ला हा नियम का नाही? बर सरकारला स्वतः हुन माहिती नाही झाले मनोहर कुलकर्णी नेमका काय करतो परंतु अनेक सामाजिक संघटना, राजकीय पक्ष व सर्वसामान्य जनता यांनी मनोहर कुलकर्णी हा देशद्रोहाचे विधाने करत आहे म्हणून पुराव्यांनीशी तक्रार दाखल करतात, अजामीनपात्र गुन्हा दाखल होऊन तात्काळ अटक व्हायला पाहिजे परंतु त्याला अटक न करता पोलीस संरक्षण दिले जाते. नेमका हा मनोहर कुलकर्णी आहे तरी कोण? मनोहर कुलकर्णी देशद्रोहाचे वक्तव्य करून, राष्ट्रध्वज, राष्ट्रगीत व स्वातंत्र्य न मानता महापुरुषांचा अवमान करून नेमकं समाजात काय पेरत आहे हे सरकार ला माहिती आहे का? देशद्रोह करणारा व्यक्ती बाहेर पोलीस संरक्षणात फिरतो यातुन जनतेचे काय? मनोहर कुलकर्णी व सामाजिक संघटना, सामाजिक कार्यकर्ते व सर्वसामान्य जनता यांच्यात वैयक्तिक कोणताही वाद नाही, केवळ कुलकर्णी समाजात द्वेष पेरत असुन चुकिचा इतिहास सांगुन राष्ट्रद्रोह करत आहे. आणि हे थांबायला पाहिजे म्हणजे अनेक लोक समोर येऊन सरकार ला विनंती करत आहेत. तरीही सरकार कुलकर्णीला कार्यक्रमाची परवानगी देत आहे. कुलकर्णी चा कार्यक्रम होऊ नाही म्हणून संविधानीक मार्गाने विरोध करणाऱ्या तरूणांवर सरकार गुन्हे दाखल करून सर्वसामान्य लोकांना अटक करत आहे. आणि ज्याचा मुळे हे घडत आहे त्याला पोलीस संरक्षण दिले जात आहे. चुकिच्या बाबींविरूद्ध मत मांडण्याचा, चुकीच्या घटनेचा निषेध करण्याचा अधिकार येथे असताना कुलकर्णी चे मनोरुग्ण चले कुलकर्णी विरोधात कोणी काही बोलले तर आम्ही पाहून घेऊन, अशा प्रकारच्या धमक्या दिल्या जात आहेत, कुलकर्णी बद्दल एकही शब्द खपवून घेणार नाही म्हणजे समाजात तेढ निर्माण होण्यासाठी कुलकर्णी प्रयत्न करत आहेच परंतु सर्व सामान्य तरुण जे केवळ धर्माच्या नावाखाली कुलकर्णी सोबत आहेत ते कुलकर्णी बद्दल एकही शब्द ऐकायला तयार नाही परंतु कुलकर्णी ने काहीही सांगितले तरी ते सत्य मानून कुलकर्णी साठी ते लोकांना धमक्या देत आहेत. याचा अर्थ कुलकर्णी याच्या बद्दल कोणी बोलायच नाही का? लिहायचे नाही का? उघडपणे धमक्या देणारे खुलेआम आहेत आणि भीडे राष्ट्रद्रोह करून महापुरुषांच्या बद्दल चुकीचे बोलतो असे म्हणणे आज गुन्हा ठरत आहे. मनोहर कुलकर्णी सह त्याचे जे धमकी देणारे चलेचपाटे आहेत त्यांना पोलीस पकडत नाहीत. परंतू देशात व राज्यात कायदा व सुव्यवस्था कायम रहावी यासाठी जे लोक प्रयत्न करत आहेत त्यांच्या वर मात्र कारवाई करून गुन्हे दाखल केले जात आहेत. याचाच अर्थ मत व्यक्त करण्याचा मुलभूत हक्क येथे सरकार कडूनच दाबल्या जात आहे. ज्यांनी मुलभूत हक्काचे संरक्षण करायला पाहिजे तेच जर मुलभूत हक्कांवर बेकायदेशीर पणे बंधने आणत असतील आणि ज्यांना तुरुंगात पाहिजे त्यांना पोलिस संरक्षण देऊन कार्यक्रम घेतले जात असतील तर अशा कृत्यामुळे भविष्यात शातंता व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊन अनेक तरुणांचे आयुष्य अंधकारमय होण्याची चिन्हे दिसत आहेत. देशद्रोही कृत्ये करणाऱ्याच्या विरोधात तक्रार दाखल असुनही त्याला पोलिस संरक्षण आणि संविधाधानीक मार्गाने कायदा व सुव्यवस्था टीकुन राहण्यासाठी प्रयत्न करणाऱ्यांना तुरुंगात जावे लागत असेल तर मानवी स्वातंत्र्याचे रक्षण कोण करेल हा प्रश्न तर समोर येणारच आहे.

**विनोद पंजाबराव सदावर्ते**
**मोबा: ९१३०९७९३००**

## पान १ वरुन

### राहुल गांधींच्या शिक्षेला..

मिळणार असल्याने विरोधकांचा आत्मविश्वास दुणावला आहे. आता लोकसभा सचिवालय किती वेगाने यावर काम करणार ते पाहावं लागेल. ज्या क्षणी स्थगिती मिळते त्या क्षणीच खासदारकी पुन्हा मिळते. त्या संबंधी राहुल गांधी यांना लोकसभा अध्यक्षांना त्याची एक प्रत द्यावी लागणार आहे.

१३ एप्रिल २०१९ रोजी लोकसभा निवडणुकांच्या प्रचारादरम्यान कर्नाटकात राहुल गांधी यांनी भाषण करताना मोदी आडनावाबाबत भाष्य केले होते. 'सगळ्या चोरांचं आडनाव मोदी का आहे?' असे राहुल गांधी म्हणाले होते. यावरुन भाजपचे नेते पूर्नेश मोदी यांनी सुरत कोर्टात त्यांच्या विरोधात मानहानीची तक्रार दाखल केली होती. त्यांनी म्हटलं होतं की, 'राहुल गांधींनी असं म्हणत मोदी आडनाव असलेल्या लोकांची बदनामी केली आहे.' त्याप्रकरणी सुरतमधील न्यायदंडाधिकारी न्यायालयाने मार्च महिन्यात निकाल देताना राहुल यांना दोषी ठरवले. त्यांना दोन वर्षे तुरूंगवासाची शिक्षा ठोठावण्यात आली. त्यामुळे त्यांची खासदारकी रद्द झाली होती.

### साखरेच्या आंतरराष्ट्रीय किमतीत

मेट्रिक टन साखरेचे उत्पादन होण्याचा अंदाज आहे. अशा प्रकारे, देशातील एकूण साखर उत्पादन सुमारे ३७३ लाख मेट्रिक टन असेल जे गेल्या ५ वर्षातील दुसऱ्या क्रमांकाचे उच्चांकी उत्पादन आहे. शिवाय, गेल्या १० वर्षांत साखरेच्या उत्पादनात लक्षणीय वाढ झाली आहे. मात्र, त्याच प्रमाणात साखरेचा खप वाढलेला नाही. त्यामुळं, कोणत्याही अनपेक्षित परिस्थितीत देशात पुरेसा साखरसाठा उपलब्ध असल्याची खात्री आहे.

जुलै २०२३ च्या अखेरीस, भारतात सुमारे १०८ लाख मेट्रिक टन साखरेचा साठा आहे. जो चालू ऊस हंगाम २०२२-२३ च्या उर्वरित महिन्यांसाठी तसेच हंगामाच्या शेवटी सुमारे ६२ लाख मेट्रिक टनच्या उद्दिष्टित साठ्यासह देशांतर्गत मागणी पूर्ण करण्यासाठी पुरेसा आहे. त्यामुळं देशांतर्गत ग्राहकांना वर्षभर पुरेशी साखर रास्त दरात उपलब्ध असेल. याशिवाय, रास्त व किफायतशीर भाव तसेच साखर कारखानदारांकडून वेळेवर परतावा करुन ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे हित लक्षात घेतले जात आहे. साखर कारखान्यांनी २०२१-२२ पर्यंतच्या साखर हंगामासाठी ऊस उत्पादक शेतकऱ्यांची ९९.९ टक्के थकबाकी आधीच मंजूर केली आहे.

चालू साखर हंगाम २०२२-२३ मध्ये देखील १.०५ लाख कोटी रुपयांहून अधिक परतावा देऊन सुमारे ९३ टक्के उसाच्या थकबाकीचे परतावे तारखेनुसार आधीच मंजूर झाल्याची माहिती केंद्र सरकारनं दिली आहे.

अशा प्रकारे, भारत सरकारने साखर क्षेत्राची योग्य धोरणे, स्थिर दर आणि शेतकऱ्यांची ऊसाची देणी वेळेवर मंजूर करून तिन्ही प्रमुख भागधारक, ग्राहक, शेतकरी आणि साखर कारखानदारांचे हित संरक्षित केले आहे.

### महाराष्ट्र विधानसभेचं हिवाळी

विधेयकासंदर्भात पुढच्या अधिवेशनापर्यंत वेगवेगळ्या प्रकारच्या बैठका होती. काही सूचनांचा अंतर्भाव केला जाईल आणि ते बिल आणलं जाईल असंही अजित पवार यांनी म्हटलं आहे. शेतकऱ्यांसाठी खतं आणि बी बियाणं जे येतं आहे त्यात भेसळ वाढली आहे. यासंदर्भातल्या बऱ्याच तक्रारी मुख्यमंत्र्यांकडे आणि सरकारकडे आल्या. त्यानंतर आम्ही यासंदर्भात विधेयक आणायचा निर्णय घेतला. त्यातही चर्चा करणं गरजेचं होतं त्यामुळे ती बिलंही आपण संयुक्त समितीकडे पाठवलं आहे. धनंजय मुंडेंच्या अध्यक्षतेखाली ती समिती गठीत करण्यात आली आहे. शेतकरी वर्गाचं नुकसान होणार नाही याकडे आमचं लक्ष असेल. तसंच जे विधेयक आणू ते शेतकऱ्यांच्या हिताचं असेल असंही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी जाहीर केलं. एकही दिवस हाऊस बंद न पडता दररोज भरपूर काम करण्यात आलं. विरोधी पक्षांना काही भूमिका घ्यावी लागते ती त्यांनी घेतली. त्याबद्दल आम्हाला काही वाईट वाटण्याचं कारण नाही. २२५ आमदारांचं बहुमत सत्ताधारी पक्षाच्या बाजूने आहे. त्यात अपक्ष आमदारही आले. समोर संख्येने कमी बळ होतं. पण त्या संख्येलाही आम्ही महत्त्व दिलं आहे. त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना, लक्षवेधींना, मुद्द्यांवर आम्ही उत्तरं दिली असंही अजित पवार यांनी जाहीर केलं.

### न भूतो न भविष्यति; २१ ते २३

राय यांनी दिली. राय पुढे म्हणाले, सोहळ्यासाठी आमंत्रित करण्यात येणाऱ्यांची यादी बनवण्यात आली असून लवकरच श्री रामजन्मभूमी ट्रस्टचे अध्यक्ष महंत नृत्य गोपाल दास यांची स्वाक्षरी असणाऱ्या निमंत्रण पत्रिका पाठवण्यात येणार आहे.ट्रस्टने अयोध्येतील मोठ्या मठांमध्ये सर्व प्रमुख संतांना निमंत्रीत करण्याची योजना आखली आहे. या २५००० संत १०००० खास पाहुण्यांपेक्षा वेगळे असतील जे रामजन्मभूमीच्या आवारात होणाऱ्या अभिषेक सोहळ्याला उपस्थित राहतील.

अयोध्येतील अभिषेक सोहळ्यासाठी येणाऱ्या भाविकांना महिनाभर मोफत भोजन देण्याची ट्रस्टची योजना आहे. राय यांच्या म्हणण्यानुसार, ट्रस्ट संपूर्ण जानेवारीमध्ये दररोज ७५,०००-१,००,००० भाविकांच्या भोजनाची व्यवस्था करण्यात येणार आहे. राम लल्लाच्या मूर्ती प्राणप्रतिष्ठेचे देशभरात प्रक्षेपण करण्याचीही तयारी सुरू आहे, जेणेकरून लोकांना हा ऐतिहासिक क्षण त्यांच्या गावातून, शहरातून आणि इतर ठिकाणांहून पाहता येईल.

दरम्यान, या वर्षी डिसेंबरपर्यंत मंदिराचे बांधकाम पूर्ण करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी ट्रस्टने कामगार आणि तंत्रज्ञांची संख्या वाढवली आहे. आता वेगवेगळ्या शिफ्टमध्ये चोवीस तास बांधकाम सुरू आहे. राम मंदिर संकुलात आधी ५५० कर्मचारी काम करत होते, मात्र गेल्या काही आठवड्यात ट्रस्टने ही संख्या जवळपास १६०० पर्यंत वाढवली आहे. ऑगस्ट २०२० मध्ये पंतप्रधानांनी राम मंदिराचे 'भूमिपूजन'केले होते.

### पीएम् मोदींच्या हस्ते एकाच

पुनर्विकासाकरता अमृत भारत स्थानक योजना ही पंतप्रधानांच्या दृष्टीकोनावर आधारित असलेली योजना सुरू करण्यात आली आहे.

या योजनेचा भाग म्हणून पंतप्रधान ५०८ रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकास प्रकल्पांची पायाभरणी करणार आहेत. २४,४७० कोटी रुपयांपेक्षा जास्त खर्चाने या रेल्वे स्थानकांचा पुनर्विकास केला जाणार आहे. शहराच्या दोन्ही बाजूंपासून योग्य अंतरावरील 'सिटी सेंटर्स' म्हणून या स्थानकांचा विकास करण्यासाठी एक बृहद आराखडा तयार करण्यात येत आहे. शहराच्या एकंदर नागरी विकासाच्या समग्र दृष्टीकोनाच्या आधारे या रेल्वे स्थानकांच्या विकासाबाबत एकात्मिकतेवर भर दिला जात आहे.

२७ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमध्ये या ५०८ रेल्वे स्थानकांचा विस्तार आहे, ज्यामध्ये उत्तर प्रदेश आणि राजस्थानमधील प्रत्येकी ५५, बिहारमधील ४९, महाराष्ट्रातील ४४, पश्चिम बंगालमधील ३७, मध्य प्रदेशातील ३४, आसाममधील ३२, ओदिशातील २५, पंजाबमधील २२, गुजरात आणि तेलंगणामधील प्रत्येकी २१, झारखंडमधील २०, आंध्र प्रदेश आणि तमिळनाडूमधील प्रत्येकी १८, हरयाणातील १५ आणि कर्नाटकमधील १३ रेल्वे स्थानकांचा आणि इतरांचा समावेश आहे.

रेल्वे मंत्रालयाने अमृत भारत स्टेशन योजनेतून देशातील ५०८ रेल्वेस्थानकांचा विकास करण्याचा निर्णय घेतला आहे. या योजनेअंतर्गत विविध अद्ययावत सोयी सुविधा प्रवाशांना उपलब्ध होणार आहेत. स्थानक प्रबंधक ऑफिस, पार्सल ऑफिस, हेल्थ ऑफिस, टीसी ऑफिस, एमसीओ ऑफिस यांचे पूर्णपणे नूतनीकरण केले जाणार आहे. नवीन कोच डिस्प्ले बोर्ड बसवण्यात येणार आहे. विकास कामांमध्ये स्थानकाच्या दर्शनी भागाचा विकास, लँडस्केपिंग, मॉडल टॉयलेट, प्लॅटफॉर्म सरफेस केबल ट्रेज, अत्याधुनिक फर्निचर भरपूर प्रकाश योजनेसाठी एलईडी, नाम फलक, पार्किंग व्यवस्था, प्रतिक्षागृह, स्वच्छतागृह, नवीन फूटओवर ब्रीज, दोन्ही प्लॅटफॉर्मवर लिफ्ट व्यवस्था, नवीन कोच डिस्प्ले, सीसीटीव्ही कॅमेरे आदींचा समावेश असणार आहे.

मुंबईतील या स्थानकांचा समावेश

भायखळा, चिंचपोकळी, परळ, माटुंगा, कुर्ला, विद्याविहार, विक्रोळी, कांजूरमार्ग, मुंब्रा, दिवा, शहाड, टिटवाळा, इगतपुरी, वडाळा रोड, सँडहर्स्ट रोड या स्थानकांचा पुनर्विकास करण्यात येणार आहे.

नाशिक जिल्ह्यातील या स्थानकांचा समावेश

मनमाड, चाळीसगाव, शेगाव, बडनेरा, मलकापूर, नेपानगर

### केदारनाथमध्ये मोठी दुर्घटना!

आहे. काल रात्री उशिरा दरड कोसळल्याने दोन दुकाने वाहून गेल्याची माहिती आहे. सेक्टर ऑफिसर गौरीकुंड, एनडीआरएफ , एसडीआरएफ (डञ्ळ्र) ही पथकं घटनास्थळी दाखल झाले आहेत. आपत्ती व्यवस्थापन अधिकारी आणि डीडीआरएफ टीम मुख्यालय उपकरणांसह घटनास्थळी रवाना झाली आहे. मुसळधार पाऊस आणि वरून दगड कोसळल्याने शोध आणि बचाव कार्य काही काळ थांबवण्यात आले असून सर्व पथके घटनास्थळी हजर आहेत.

केदारनाथ धामचा मुख्य थांबा असलेल्या गौरीकुंड येथील डाकपुलियाजवळ डोंगरावरून दगड तुटून दोन दुकानांवर पडल्याने दुकानांचे नुकसान झालं आहे. मिळालेल्या माहितीनुसार, १३ जण बेपत्ता असल्याचे सांगण्यात येत आहे. एसडीआरएफचे पथक घटनास्थळी तपासात गुंतले आहे. राज्यातील विविध डोंगराळ भागात गुरुवारी रात्रीपासून पाऊस पडत आहे. पावसामुळे गौरीकुंड येथील डोंगरावरून दगड कोसळून दुकानांवर पडले आहेत.

### वन्यप्राण्यांच्या हल्ल्यांत मृत्यू ..

औषधोपचार करणे अगत्याचे असल्यास त्याची मर्यादा रुपये ५० हजार प्रति व्यक्ती अशी राहील. शक्यतो औषधोपचार शासकीय किंवा जिल्हा रुग्णालयात करावे, असे शासन निर्णयात नमूद करण्यात आले आहे. वाघ, बिबट्या, अस्वल, गवा (बायसन), रानडुक्कर, लांडगा, तरस, कोल्हा, मगर, हत्ती, रानकुत्रे (ढोल), रोही (निलगाय) व माकड / वानर यांच्या हल्ल्यात मनुष्य हानी झाल्यास मृत्यू, कायम अपंगत्व, गंभीर जखमी, किरकोळ जखमी या वर्गवारीनुसार अर्थसहाय्य संबंधितांना अदा करण्यात येते. वन्यप्राण्यांच्या हल्ल्यात अनेक वेळा मनुष्य मृत्यू होत नाही, परंतु गंभीर किंवा किरकोळ जखमी होतात. जखमी व्यक्तीला योग्य व तातडीचे उपचार मिळावेत व ते प्राथमिकतेने शासकीय रुग्णालयात मिळावेत याबाबत प्रशासनाकडून सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येतात व मानवी जीव वाचविण्यात येतो. काही वेळा उपयुक्त संसाधन युक्त शासकीय रुग्णालय जवळ उपलब्ध नसते व अशा प्रसंगी जखमी व्यक्तीला खासगी रुग्णालयात जाऊन तातडीचा उपचार करावा लागतो. वन्यप्राणी हल्ल्यामुळे मृत व्यक्तीच्या वारसांना देण्यात येणाऱ्या रकमेपैकी रुपये १० लाख देय असलेल्या व्यक्तीला तत्काळ धनादेशाद्वारे व उर्वरित रक्कम रुपये १० लाख पाच वर्षांकरिता मुदत ठेवीमध्ये ठेवावे आणि उर्वरित पाच लाख रुपये १० वर्षाकरिता मुदत ठेवमध्ये ठेवावे. दहा वर्षांनंतर वारसांना पूर्ण रक्कम मिळेल, असे मंत्री श्री. मुनगंटीवार यांनी आपल्या निवेदनात सांगितले.

### गुंतवणूकदारांच्या खात्यात सहारा रिफंडचे पैसे जमा; गृहमंत्री अमित शहांनी केले हस्तांतरित

नवी दिल्ली/वृत्तसंस्था :सहारा इंडियाच्या कोट्यवधी गुंतवणूकदारांसाठी एक दिलासादायक बातमी. वर्षानुवर्षे अडकलेले गुंतवणूकदारांचे पैसे मिळण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. यापूर्वी, गुंतवणूकदारांचे पैसे परत करण्यासाठी केंद्र सरकारनं सहारा रिफंड पोर्टल सुरू केलं होतं, ज्यावर लाखो गुंतवणूकदारांनी पैसे मिळवण्यासाठी अर्ज केले होते. शुक्रवारी केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शहा यांनी सहारा समूहाच्या सहकारी संस्थांच्या ठेवीदारांची रक्कम सहारा रिफंड पोर्टलद्वारे हस्तांतरित केली आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी, मुद्रक, प्रकाशक, संपादक, कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन्स अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार , रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु.पो. गोगांव ता. अक्कलकोट जि सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे email ; yashsiddhinewsgmail.com www.yashsiddhinews.com mo: 9921988358

This newspaper is printed by the Owner , Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor, Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur 413002 [Maharashtra], Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 [Maharashtra]. Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

# साहित्यरत्न अण्णाभाऊ साठेंना त्यांच्या कवितेतून अभिवादन

## पुष्परत्न साहित्य समूह नाशिक येथे कवींचे काव्यवाचन

नाशिक : लोकशाहीर, साहित्यरत्न, डॉ. अण्णा भाऊ साठे यांच्या १०३ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या कवितांचे अभिवाचन करण्याचा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन काव्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. निशांत गुरु, प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. आनंद आहिरे, विडंबनकार संजय आहेर, लोककवी रविकांत शार्दुल, अरुण घोडेराव या प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ गझलकार प्रा. निशांत गुरु यांना मानाची शाल, सन्मानपत्र व ग्रंथ देऊन कार्यक्रमाचे आयोजक तथा पुष्परत्न साहित्य समूहाचे अध्यक्ष प्रा. डॉ. आनंद अहिरे यांनी सन्मानित केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ.आनंद आहिरे यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे या शब्दाचा मतीत अर्थ सांगून अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य व जीवन हे फक्त महाराष्ट्र पुरते मर्यादित नसून संपूर्ण जगभर पसरलेले आहे. त्यांच्या साहित्यामध्ये कामगार बहुजन वर्ग वंचित व पिडितांच्या वेदनांचा ऊहापोह केलेला आहे.

लोककवी रविकांत शार्दुल यांच्या माझी मैना गावावर राहिली या बहारदार लावणीने सुरू झालेले कवितांचे अभिवाचन उत्तरोत्तर बहरत गेले याप्रसंगी उपस्थित कवी,कवयित्री, सुषमा घोलप, अरुण घोडेराव, सुभाष उमरकर, विडंबनकार संजय आहेर, प्रा.डॉ.आनंद आहिरे, सीमा राणी बागुल, मोहन पाटील,रामचंद्र शिंदे, लोकनाथ जाधव, अरुण पाल, विश्वनाथ साठे,योगेश जाधव,



प्रा.सुभाष शेलार, विकास पाटील, सुनील जाधव, राहुल शेळके, धीरज कांबळे, किशोर निकम, सागर गांगुर्डे, यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या कविता लोकगीत छक्कड वगैरे विविध शैलीत सादर करून उपस्थितांची मने जिंकत टाळ्या मिळवल्या.कार्यक्रमाचे अध्यक्ष ज्येष्ठ गझलकार प्रा. निशांत गुरु यांनी उपस्थितांना अध्यक्षीय मनोगतातून मार्गदर्शन करताना अण्णाभाऊ साठे यांच्या जग बदल घालुनी घाव या कवितेचे गझल रूपात आवेश पूर्ण सादरीकरण करत मार्गदर्शन केले. साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे लेखन कविता, कथा, कादंबरी, नाटक, प्रवास वर्णन, लोकनाट्य, वगनाट्य, पोवाडा, लावणी, छक्कड, लोकगीत, चित्रपट गीत अशा विविध अंगाने सर्व स्पर्शी होते. फकीरा, वारणेचा वाघ, माकडीचा माळ,वाघवैजयंती, इत्यादी कादंबऱ्यावर प्रेक्षकांच्या मनावर अधिराज्य गाजवणारे गाजलेले चित्रपट प्रदर्शित झालेले आहेत. अण्णाभाऊ साठे यांना त्यांच्या जयंतीच्या निमित्ताने त्यांच्याच साहित्य वाचनातून अभिवादन करणारा हा महाराष्ट्रातील पहिला आणि एकमेव अभिनव असा उपक्रम आहे असे याप्रसंगी बोलताना महाराष्ट्र बँकेचे सेवानिवृत्त व्यवस्थापक मा.अरुण घोडेराव यांनी आपल्या मनोगतातून व्यक्त केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विडंबनकार संजय आहेर यांनी प्रत्येक कवींच्या कवितांच्या अभिवाचनानंतर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचा जीवनपट उलगडून अतिशय सूत्रबद्ध केले. तर आभार प्रदर्शन सीमा राणी बागुल यांनी उपस्थित प्रमुख पाहुण्यांसह कवी कवयित्री साहित्यिक श्रोते व इतरांचे आभार मानले.कार्यक्रमाच्या आयोजनात आहिरे स्पर्धा परीक्षा अकॅडमी, शिक्षक प्रतीक जगताप, गोरख आहिरे, प्रत्यूष आहिरे, रवी जाधव, मयूर सोनार यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# बऱ्हाणपूर येथे लहुजी शक्ती सेनेच्या नामफलकाचे अनावरण

अक्कलकोट/प्रतिनिधीः लोकशाहीर साहित्य सम्राट अण्णाभाऊ साठे यांच्या १०३ व्या जयंतीचे अवचित्य साधून लहुजी शक्ती सेनेच्या नामफलकाचे उदघाटन बऱ्हाणपूर तालुका अक्कलकोट येथे लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष वसंत देडे यांच्या करण्यात आले.यावेळी लहुजी शक्ती सेनेचे सुधाकर पाटोळे,जिल्हा कार्याध्यक्ष राम कांबळे,सुधाकर भाऊ पाटोळे यांच्या उपस्थित नामफलकाचे कार्यक्रम पार पडला.



अलीकडच्या काळात मातंग समाजाची एकजुट व जागृत होणे ही अभिनमाची बाब असुन समाजाच्या विविध समस्या साठी प्रखरपणे रस्त्यावर एकजुटीने येत आहे.हे लहुजी शक्ती सेनेचे मोठे यश असल्याचे लहुजी शक्ती सेनेचे जिल्हाध्यक्ष वसंत देडे यांनी मनोगत प्रसंगी बोलत होते.

तत्पूर्वी सरपंच सागर कल्याणशेट्टी यांच्या हस्ते लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन करून मिरवणुकीला प्रारंभ केले. यावेळी वंचित बहुजन आघाडीचे अक्कलकोट शहराध्यक्ष विशाल ठोंबरे,महासचिव भारत देडे, सद्दाम शेख, समर्थ देडे,मनसे शहर संघटक देवेंद्र शिंदे, विठ्ठल उकरंडे, सुगंधव करंडे, विशाल उकरंडे, हनुमंत उकरंडे, राजेंद्र उरंडे, वैभव उकरंडे,भागवत उकरंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# अभिजीत पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त श्री विठ्ठल कारखान्यावर वृक्षारोपण

पंढरपूर/प्रतिनिधीः श्री विठ्ठल सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन मा श्री अभिजीत आबा पाटील यांच्या ४० व्या वाढदिवसानिमित्त औचित्य साधून कारखाना येथे सर्व रोग निदान शिबिर रक्तदान शिबिर असे विविध कार्यक्रम समाज उपयोगी कार्यक्रम राहुल साजरा करण्यात येत आहे यामध्ये कारखाना स्थळावर वृक्षारोपण कार्यक्रम श्री सूर्यकांत भाऊसाहेब मोरे तालुका कृषी अधिकारी पंढरपूर व श्री सुभाषराव वसंतराव भोसले माजी नगराध्यक्ष पंढरपूर यांच्या शुभहस्ते करण्यात आले.सदर कार्यक्रमास कारखान्याचे व्हाईस चेअरमन सौ प्रेमलता बब्रुवान रोंगे संचालक




संभाजी ज्ञानोबा भोसले कालिदास पाटील दिनकर चव्हाण सुरेश भुसे बाळासाहेब हाके धनंजय काळे साहेबराव नागणे कालिदास साळुंखे सचिन वाघाटे जनक भोसले प्रवीण कोळेकर नवनाथ नाईक नवरे सिताराम गवळी अशोक जाधव सिद्धेश्वर बंडगर सविता रणदिवे श्रीमती कलावती खटके दशरथ जाधव अशोक तोंडसे तुकाराम मस्के तानाजी बागल सचिन पाटील तानाजी बागल उमेश मोरे आनंद चिखलकर अशोक घाडगे गणेश ननवरे समाधान गाजरे कारखान्याचे कार्यकारी संचालक डी आर गायकवाड व कारखान्याचे सर्व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते



## मंदिर समितीच्या कर्मचाऱ्याचा प्रामाणिकपणा,सोने वस्तू भाविकास परत

पंढरपूर/प्रतिनिधी : श्री.विठ्ठल रूक्मिणी मंदिरात श्रींच्या मुखदर्शनरांगेत श्रीमती निता संतोष कोकीळ, मु.पो.जांबे, ता.मुळशी, जि.पुणे यांचे २.५ तोळे सोन्याचे गंठण हरविले होते. सदर सोन्याची वस्तू तेथील मंदिर समितीच्या कर्मचारी श्रीमती इंदू रणदिवे यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी मंदिर समितीच्या कार्यालयात जमा केली होती. सदर वस्तू व संबंधित भाविकाची ओळख पटल्यानंतर सर्व शाहनिशा करून संबंधित भाविकास परत करण्यात आली आहे.

## उस्मानाबाद येथे नवीन जिल्हा रुग्णालयाला मंजुरी..

उस्मानाबाद/प्रतिनिधी : पालकमंत्री तथा आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रा.डॉ. तानाजीराव सावंत जिल्ह्याच्या विकासाला गती मिळत आहे. त्यामुळे विविध योजना आणि प्रकल्प येत असल्याने त्यासाठी मोठा निधी जिल्ह्याला उपलब्ध होत आहे. यात भर घालत आता उस्मानाबाद येथे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाले असल्याने व



जिल्हा रुग्णालयाचे ठिकाण वैद्यकीय महाविद्यालयास दिले असल्याने जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न निर्माण झाला होता. पालकमंत्री यांच्या पुढाकार आणि पाठपुराव्यामुळे नवीन जिल्हा रुग्णालयाला जागा अधिग्रहित करून सदर जागेवर नवीन जिल्हा रुग्णालयाचे बांधकाम तसेच पदनिर्मितीबाबत लवकरच कार्यवाही करण्यात येणार आहे. यापूर्वी ३० जूनच्या शासन निर्णयानुसार भूम तालुक्यातील पाथरूड, इट, आणि माणकेश्वर, येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालयामध्ये श्रीवर्धन करण्यास ही कोणाकडून मान्यता मिळाली आहे. पालकमंत्री डॉक्टर सावंत यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे भूम तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्रांना ३० खटांचे ग्रामीण रुग्णालय आणि उस्मानाबाद येथे नवीन जिल्हा रुग्णालय मंजूर झाल्याने जिल्ह्याच्या ठिकाणी रुग्णांना चांगल्या वैद्यकीय सुविधा मिळण्यास मदत होणार आहे. त्यामुळे जिल्ह्यातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार हे मात्र निश्चित आहे.

# वाचन करणे हाच अभ्यासाचा आत्मा आहे : अपर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे

पंढरपूर/प्रतिनिधीः विद्यार्थ्यांनी कोणत्याही विषयाचा अभ्यास करताना वाचन करणे ही प्रक्रिया महत्वाची आहे. वाचनाचर आवड निर्माण करण्यासाठी अभ्यासक्रमा व्यतिरिक्त इतर विषयांच्या पुस्तकांचे वाचन केले पाहिजे. अशा वाचनामुळे आपले विचार अगदी निर्भीडपणे आपण मांडू शकतो. असे मार्गदर्शन अपर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी विद्यार्थ्यांना केले.




महसूल सप्ताहनिमित्त युवा संवाद कार्यक्रमातर्गंत यश पॅलेस येथे विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परिक्षेबाबत मार्गदर्शन, वेळेचे व्यवस्थापन व युवकांशी संवाद या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी प्रांताधिकारी गजानन गुरव, तहसिलदार सुशिल बेल्हेकर, अपर तहसिलदार तुषार शिंदे, भुमिअभिलेख उप अधिक्षक अभिषेक सोनार, नायब तहसिलदार मनोज श्रोत्री, पी.के.कोळी, निवडणुक नायब तहसीलदार वैभव बुचके पुरवठा निरीक्षण अधिकारी शितल कन्हेरे तसेच महाविद्याचे प्राचार्य व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अपर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे म्हणाले, स्पर्धा परीक्षेचा अभ्यास करतांना आपल्याला अनेक घटकांवरील विविध पुस्तकांच अगदी सखोल वाचन करावे. स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासक्रमाच्या पुस्तकांबरोबरच विविध नियतकालिकं, वर्तमानपत्र, अहवाल यांचंही वाचन स्पर्धा-परीक्षांच्या अभ्यासात महत्वाचं ठरते. परिणामी आपल्या वाचनाचा वेग व कार्यक्षमता अशा दोन्ही गोष्टी आपल्या यशामागे महत्वाच्या ठरतात. प्रत्येक विद्यार्थ्यांच्या जीवनात यशवंत होण्यासाठी परीक्षा द्यावी लागते. परीक्षेत यश संपादन करण्यासाठी विद्यार्थ्यांनी अभ्यास कसा करावा हे शास्त्र आत्मसात केले पाहिजे. केवळ उद्या परीक्षा म्हणून आदल्या दिवशी रात्रभर अभ्यास करून चालणार नाही. तर प्रत्येक विषयाच्या अभ्यासाचे नियोजन करून नियमित अभ्यास केला पाहिजे.

स्पर्धा परीक्षेत ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या यशस्वीतेचे प्रमाण आज वाढल्याचे आपणास दिसून येते. तरी अजूनही स्पर्धा परीक्षांबाबत दिशाहीन व अजागरूक असा मोठा वर्ग पण पाहावयास मिळतो. म्हणुनच त्यांना मार्गदर्शनाची गरज असून स्पर्धेच्या युगात यशस्वी होण्यासाठी मार्गदर्शन आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी सुत्रबध्द व शिस्तबध्द पध्दतीने अभ्यास करणे गरजेचे आहे. अभ्यास परिणामक करण्यासाठी वाचनाचा वेग वाढवला पाहिजे व त्याचे आकलनही झाले पाहिजे. त्याचबरोबर भाषेवरही प्रभुत्व असणे आवश्यक आहे. असेही अपर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी यावेळी सांगितले.

यावेळी यूपीएससी, एमपीएससी, सरळ सेवा भरती परीक्षेबाबतची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. तसेच प्रश्नोत्तराच्या सत्रात विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन विविध उदाहरणे देऊन अपर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी केले

# चेअरमन अभिजीत पाटील यांचे ४० व्या वाढदिवसानिमित्त बाभुळगांव येथील मुकबधीर शाळेतील विद्यार्थ्यांना स्नेह भोजन व वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न



पंढरपूर/प्रतिनिधीः श्री विठ्ठल सह. साखर कारखान्याचे चेअरमन अभिजीतआबा पाटील साहेब यांच्या ४० व्या वाढदिवसाचे औचित्य साधुन कारखाना येथे सर्व रोग निदान शिबीर, रक्तदान शिबीर असे विविध समाजपयोगी कार्यक्रम राबवुन साजरा करणेत येत आहे. त्यामध्ये श्री नागनाथ मूक बधीर शाळा, बाभुळगांव येथील विद्यार्थ्यांना स्नेह भोजन देण्यात आले. तसेच वृक्षारोपणाचा कार्यक्रम संपन्न झाला. सदर कार्यक्रम कारखान्याचे संचालक श्री जनक भोसले यांचे अध्यक्षतेखाली व कार्यकारी संचालक श्री डी. आर. गायकवाड यांचे प्रमुख उपस्थित संपन्न झाला.

सदर कार्यक्रमाप्रसंगी प्रास्ताविक व स्वागत पर भाषणामध्ये बोलताना मुकबधीर शाळेचे मुख्याध्यापक श्री मधुकर भोसले म्हणाले की, आपण मागील वर्षापासुन कारखान्याचे चेअरमन मा. श्री अभिजीतआबा पाटील साहेब यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधुन येथील विदयार्थ्यांना स्नेहभोजन देण्याचा उपक्रम राबवित आहात. त्याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त केले. या निष्पाप बालकांकडुन आबांचे वाढदिवसानिमित्त लाख लाख शुभेच्छा व्यक्त केल्या.

याप्रसंगी कारखान्याचे प्र. कार्यकारी संचालक डी. आर. गायकवाड म्हणाले की, अभिजीत आबा पाटील यांनी आपल्या कार्याची सुरुवात २०१७ पासुन केली आहे. त्यांच्या रुपाने आपल्याला धडाडीचे नेतृत्व लाभले आहे. त्यांचे हातुन असेच गोरगरीब जनतेसाठी समाजपयोगी कार्य घडावे व त्यांची वरचेवर प्रगती व्हावी अशा भावना व्यक्त केल्या. सदर कार्यक्रमास शिवप्रेमी दुध संकलन या संस्थेचे चेअरमन गणेश गांडुळे, तेजस इंग्लिश मिडीयम बाभुळगांवचे संस्थापक महेश कथले, विशाल भोसले, रोकडे, मुकबधीर विदयालयाचे सर्व स्टाफ व कारखान्याचे सर्व अधिकारी, कर्मचारी वर्ग, कार्यकर्ते, सभासद व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.सदर कार्यक्रमाचे सुत्रसंचालन मुकबधीर विदयालयाचे श्री खडतरे सर यांनी केले.

## नापास विद्यार्थ्यांची घेणार विद्यापीठ पुरवणी परीक्षा

सोलापूर/प्रतिनिधीः पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून पदवीच्या अंतिम सत्राच्या सर्व अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत. या निकालात साधारण १५ ते २० टक्के विद्यार्थी अनुत्तीर्ण झाले आहेत. आता या विद्यार्थ्यांसाठी पुरवणी परीक्षा घेण्याचे नियोजन विद्यापीठ प्रशासन करीत आहे. विद्यापीठाच्या या निर्णयामुळे अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांना उत्तीर्ण होण्याची सुवर्णसंधी यामुळे प्राप्त होणार आहे. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. राजनीश कामत आणि प्र- कुलगुरू डॉ. गौतम कांबळे यांनी विद्यार्थ्यांसाठी हा निर्णय घेतला आहे. विद्यापीठ इतिहासात पहिल्यांदाच हा निर्णय घेण्यात आला आहे. विद्यापीठाच्या पदवी अंतिम वर्षाच्या सर्व अभ्यासक्रमांचे निकाल जाहीर झाले आहेत.

त्यामुळे आता विद्यार्थ्यांना पुढील शिक्षण व करिअरसाठी उत्तीर्ण होणे फार महत्त्वाचे असते. पंधरा ते वीस टक्के विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्याने त्यांचा पुढील मार्ग सुखकर करण्यासाठी व त्यांना आनंददायी शिक्षण व करिअर करण्यासाठी तातडीने पुरवणी परीक्षा घेण्याचे नियोजन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाकडून करण्यात येत आहे. त्यामुळे आता लवकरच अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी पुरवणी परीक्षा होईल.

# प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांनी घेतली शरद पवारांची दिल्लीत भेट

पंढरपूर/प्रतिनिधीः राष्ट्रवादी काँग्रेसचे उद्योग व व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश दादा फाटे यांनी खा. शरद पवार साहेब यांची दिल्लीत भेट घेतली आहे सदरचे भेट शुक्रवारी सकाळी ९ वाजता जनपद या पवार यांच्या निवासस्थानी प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांनी सांगितले

दिल्ली येथील बैठकीमध्ये सध्या राज्यामध्ये उद्योग व व्यापार विभागाचे काम अत्यंत समाधानकारक असून तसेच राष्ट्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणात काम करण्याबाबत बैठकी आँटी चर्चा झाली पंढरपूर तालुक्यातील हॉटेल यांचे मूळ गाव असलेल्या गादेगाव येथे रयत शिक्षण संस्थेचे न्यू इंग्लिश स्कूल नावाचे हायस्कूल आहे स्कूलमध्ये इमारत बांधकाम व भूमिपूजन खा. पवार यांनी केले होते त्यानंतर ग्रामस्थांनी दिलेल्या लोकवर्गणीतून मोठ्या प्रमाणावर काम प्रगतीपथावर आहे

उर्वरित कामासाठी आपल्या रयत शिक्षण संस्थेच्या वतीने निधी मिळावा यासाठी फाटे यांनी अध्यक्ष म्हणून शरद पवार यांना लेखी निवेदन देऊन मागणी केली आहे यावर पवार यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे यामुळे शाळा इमारतीचे बांधकाम पूर्ण होणार आहे पेटी प्रसंगी शरद पवार पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला यावेळी युवा उद्योजक सचिन धुमाळ दिल्ली येथील राष्ट्रपती भवन येथील उद्यान विभागाचे बाळासाहेब बुळे त्यांच्यासह राष्ट्रवादी उद्योग व्यापारचे कार्यकर्ते उपस्थित होते



# सुप्रीम कोर्टाचा निकाल हा हुकमशाही सरकारला मिळालेली चपराक : गायकवाड



सोलापूर/प्रतिनिधी : काँग्रेस चे जेष्ठ नेते राहुल गांधी यांच्या बाबतीत सुप्रीम कोर्टाने आज दिलेला निकाल हा न्यायचा आणि सत्याचा असून हुकूमशाही सरकारला दिलेली मोठी चपराक आहे अशी प्रतिक्रिया राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे सरचिटणीस सुयश गायकवाड यांनी व्यक्त केली,

सुप्रीम कोर्टाने राहुल गांधी यांच्या दोन वर्षाच्या शिक्षेला दिली स्थगिती देऊन मोदी सरकारला चपराक दिली असून राहुल गांधीना सुप्रिम कोर्टातून न्याय मिळाला आहे, हा न्याय डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या कायद्याच्या चौकटीत मिळाला आहे देशातील लोकशाही संपवून देशात हुकूमशाही आणण्याचा डाव सुरू आहे परंतु हे डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या संविधानामुळे शक्य होणार नाही असेही सुयश गायकवाड यांनी म्हटले आहे.

काँग्रेसचे जेष्ठ नेते राहुल गांधी यांची खासदारकी संपविण्याचा हा मोठा कट होता हा कट न्यायव्यवसंस्थेला हाताशी धरून आखण्यात आला हॉस्टे होता, असा संशय ही त्यांनी व्यक्त केला आहे.

सुप्रीम कोर्टाचा हा निकाल जनतेचा आवाज संसदेत बुलंद करणारा हा निकाल आहे,. आजच्या निकालाने सत्याचा विजय झाला आहे असेही सुयश गायकवाड यांनी म्हटले,

सुप्रीम कोर्टाचा निर्णय हा राहुल गांधी यांच्या बाजूने लागला असून एक प्रकारे हुकूमशाहा मोदी सरकारला सुप्रीम कोर्टाने दिलेली फार मोठी चपराक दिली आहे. हा विजय न्यायदेवतेचा असून त्याचे आम्ही स्वागत करतो. सत्य परेशान हो सकता है लेकिन पराजित नही असेही त्यांनी आज पत्रकारांशी बोलतांना म्हणाले

# केंद्र शासनाने सहकारी संस्थांबाबत घेतलेल्या निर्णयांची राज्यात प्रभावी अंमलबजावणी : सहकार आयुक्त अनिल कवडे

पुणे : केंद्र शासनाने सहकारी संस्थांबाबत अनेक मोठे निर्णय घेतले असून त्याची अंमलबजावणी राज्यामध्ये चांगल्याप्रकारे करण्यात येत आहे. विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था स्वावलंबी व्हाव्यात आणि कार्यक्षमपणे काम करावयात यादृष्टीनेही प्रयत्न करण्यात येत आहे. अशी माहिती सहकार आयुक्त अनिल कवडे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

महाराष्ट्रामध्ये २० हजारपेक्षा जास्त विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था ग्राम पातळीवर कार्यरत आहेत.

या संस्था आर्थिकदृष्ट्या बळकट होणे व त्या माध्यमातून पतपुरवठा विविध सेवा व वस्तुंचा पुरवठा ग्रामीण भागातील जनतेला व्हावा, या दृष्टीकोनातून या संस्थांचे संगणकीकरण होत आहे. या संस्थांच्या पोटनियमामध्ये काही बदल करण्यात आले असून बाहेरील कर्ज घेण्याची मर्यादा स्वनिधीच्या १० पटऐवजी २५ पट करण्यात आली आहे. तसेच या संस्थांना १५२ प्रकारच्या वस्तु व सेवांचा व्यवसाय करता येईल, अशीही तरतूद करण्यात आली आहे. राज्यामध्ये याबाबत विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या पातळीवर कार्यवाही सुरु झालेली आहे.

विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या माध्यमातून संबंधीत संस्थांच्या सभासदांना किफायतशीर दरामध्ये योग्य दर्जाची जेनरीक औषधे उपलब्ध होण्याच्या दृष्टीकोनातून या संस्थांना जेनरीक औषधी दुकानांचे परवाने देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रत्येक जिल्ह्यात किमान अशा प्रकारची ५ दुकाने उघडण्याबाबत कार्यवाही करण्यात आली असून राज्यामध्ये आतापर्यंत ३४० संस्थांनी असा उपक्रम घेण्याची तयारी दर्शविली आहे. यातील आतापर्यंत ३२० संस्थांनी ऑनलाईन रजिस्ट्रेशन पूर्ण केले आहे. नजीकच्या भविष्यकाळात या दुकानांच्या माध्यमातून स्वस्त दराने औषधी पुरवठा झाल्यामुळे जनतेच्या दैनंदीन खर्चामध्ये मोठ्या प्रमाणात बचत होणार आहे.

विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांच्या माध्यमातून विविध प्रकारच्या ई-सेवा देण्याच्या दृष्टीकोनातून कॉमन सर्व्हिस सेंटर या संस्थांमार्फत सुरु करण्याबाबत कार्यवाही सुरु करण्यात आली असून राज्यातील आतापर्यंत २ हजार ७०० संस्थांनी कॉमन सर्व्हिस सेंटर अंतर्गत नोंदणी केलेली आहे. या माध्यमातून भविष्यकाळामध्ये ग्राम पातळीवर लागणाऱ्या ३०० पेक्षा जास्त सेवा पुरविल्या जातील.

राज्यातील धान्य उत्पादनाचा विचार करुन साठवणुक क्षमता सहकारी संस्थांमार्फत वाढविण्याचा उपक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने राज्यातील नेर पिंगळाई, जि. अमरावती येथील विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थेमार्फत पथदर्शी प्रकल्प राबविण्यात येत आहे.

विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांमार्फत मोठ्या प्रमाणामध्ये वस्तु व सेवा पुरवठ्याबाबत उपक्रम राबविण्यात येत आहेत. पुढील काळात या संस्था आत्मनिर्भर बनतील व संबंधीत गावांसाठी खऱ्या अर्थाने विकास केंद्र म्हणून काम करतील, अशी अपेक्षा सहकार आयुक्तांनी व्यक्त केली आहे. ग्रामीण भागातील अर्थव्यवस्थेला व शेतीशी संबंधीत सर्व उपक्रम विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्थांसाठी सहाय्यभूत ठरतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला आहे.

# कै पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलनात जडी-बुटी दिन साजरा



अक्कलकोट/प्रतिनिधीः महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या सौ. सुरेखा कल्याणशेट्टी माध्य. व उच्च माध्यमिक मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय ,मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी कला,वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय ,गिरीजामाता मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय यांच्या वतीने योगगुरू रामदेवबाबा यांचे सहयोगी आयुर्वेद आचार्य पूज्य बाळकृष्णजी हे योग व आयुर्वेदिक औषध निर्मिती कार्यात भरीव कामगिरी केल्यामुळे त्यांचा जन्मदिवस ४ ऑगस्ट हा जाडी-बुटी दिन म्हणून साजरा करण्यात आला. याप्रसंगी जेष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी,प्राचार्य मलकप्पा भरमशेट्टी, पर्यवेक्षक मोतीलाल चव्हाण, अक्कलकोट पतंजली योग समितीचे महिला प्रमुख श्रीमती कस्तुरीताई गुरव, चिकित्सा प्रमुख लक्ष्मण पाटील यांच्या हस्ते शालेय परिसरात विविध औषधी वनस्पतींची रोपे लावून पर्यावरण शुद्धीसाठी मंत्रघोषात होमहवन करण्यात आले. कस्तुरीताई गुरव व लक्ष्मण पाटील यांनी विविध औषधी वनस्पतीचे उपयोग व महत्त्व सांगितले.

यावेळी संचालिका सौ शांभवी कल्याणशेट्टी,सीईओ सौ रुपाली शहा, ज्युनियर विभाग प्रमुख सौ पूनम कोकळगी पथमिकचे मुख्याध्यापक सुरेश आवटे निखिल भालेराव तसेच शिक्षक, विद्यार्थी व कर्मचारीवर्ग उपस्थित होते.

हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी पतंजली योग समिती तसेच सांस्कृतिक विभाग प्रमुख खंडेराव घाटगे, वनविभाग प्रमुख सुरेश रूगे यानी प्रयत्न केले.

# महावितरणच्या झटपट वीज कनेक्शन मोहिमेचा एक महिन्यात आठ हजार ग्राहकांना लाभ

मुंबई :नवीन वीज कनेक्शन घेऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांना शहरी भागात चोवीस तासात तर ग्रामीण भागात ४८ तासात कनेक्शन देण्याच्या महावितरणच्या मोहिमेत राज्यात जुलै महिन्यात एकूण ८०६३ वीज ग्राहकांना झटपट कनेक्शन मिळाले . यामध्ये अर्ज केल्याच्या दिवशीच कनेक्शन मिळालेल्या ग्राहकांची संख्या ५१० असून ३७७५ ग्राहकांना शुल्क भरल्यानंतर २४ तासात कनेक्शन मिळाले . ग्रामीण भागात ६१६ ग्राहकांना अर्ज केल्यानंतर तातडीने शुल्क भरल्यामुळे ४८ तासात कनेक्शन मिळाले तर ३१६२ ग्राहकांना शुल्क भरल्यानंतर ४८ तासात वीज जोडणी मिळाली.

उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री मा. देवेंद्र फडणवीस यांनी महावितरणला दर्जेदार, गुणवत्तापूर्ण व ग्राहकाभिमूख सेवा देण्याची सूचना केली आहे. त्यानुसार महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक लोकेश चंद्र यांनी नव्या वीज कनेक्शनसाठीचे अर्ज तातडीने निकाली काढण्याचा आदेश दिला आहे. याचा भाग म्हणून महावितरणने जून महिन्यात दहा दिवसात एक लाख नवीन घरगुती वीज कनेक्शन दिली. आता नव्या कनेक्शनसाठी अर्ज करणाऱ्या ग्राहकांना शहरी भागात २४ तासात तर ग्रामीण भागात ४८ तासात वीज कनेक्शन देण्याचे काम कंपनीने सुरू केले आहे. महावितरणचे संचालक संजय ताकसांडे यांच्या मार्गदर्शनात ही मोहीम चालू आहे.ग्राहकांनी नव्या वीज कनेक्शनसाठी अर्ज केल्यानंतर महावितरणचे कर्मचारी जागेची पाहणी करून किती शुल्क भरायचे याची माहिती देतात. त्यानुसार शहरी भागातील ज्या ग्राहकांनी शुल्क भरले त्यांना चोवीस तासात कनेक्शन देण्यावर भर देण्यात आला. राज्यभरात अशा एकूण ३७७५ ग्राहकांना जुलै महिन्यात लाभ झाला. महावितरणकडे अर्ज केल्यानंतर सूचना मिळाल्यावर तातडीने शुल्क भरणाऱ्या ५१० ग्राहकांना अर्ज केल्याच्या दिवशीच नवीन कनेक्शन मिळाले.ग्रामीण भागासाठी अंतर व इतर अडचणी लक्षात घेऊन ४८ तासांचा कालावधी निश्चित करण्यात आला आहे. ग्रामीण भागात ज्या ग्राहकांनी तातडीने शुल्क भरले अशा ६१६ ग्राहकांना अर्ज केल्यानंतर ४८ तासात कनेक्शन मिळाले. तर अर्ज केल्यानंतर आपल्या सोयीने शुल्क भरल्यानंतर ४८ तासात कनेक्शन मिळणाऱ्या ग्राहकांची संख्या ३१६२ आहे.

कृषी ग्राहकांना वीज कनेक्शन देणे हे तुलनेने अवघड असते. शेतामध्ये दूरवर असलेल्या विहिरीवरील कृषी पंपासाठी वीज कनेक्शन देण्यासाठी विजेचा खांब, वायर, ट्रान्सफॉर्मर अशा पायाभूत सुविधा अनेकदा उभाराव्या लागतात. त्यामुळे शेतकऱ्यांनी अर्ज केल्यानंतर त्यांना जोडणी मिळण्यास विलंब लागतो. ही समस्या सोडविण्यासाठी महावितरणने गेल्या वर्षभरात मोहीम राबविली. त्यातून निर्माण झालेल्या पायाभूत सुविधांमुळे शेतकऱ्यांना कृषी पंपांसाठी कनेक्शन देण्याचाही वेग वाढला आहे. जुलै महिन्यात राज्यात १२२७ शेतकऱ्यांना झटपट वीज कनेक्शन मिळाली. त्यापैकी ७४ शेतकऱ्यांना अर्ज केल्याच्या दिवशीच तर ४९३ शेतकऱ्यांना शुल्क भरल्यानंतर २४ तासात वीज कनेक्शन मिळाले. अर्ज केल्यानंतर ४८ तासात कनेक्शन मिळालेल्या शेतकऱ्यांची संख्या ११७ आहे तर ५४३ शेतकऱ्यांना शुल्क भरल्यानंतर ४८ तासात कनेक्शन मिळाले.

# श्री.छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रूग्णालयात तृतीयपंथी मित्र मदत केंद्राचे उद्घाटन

## जिल्ह्यातील २०१ तृतीयपंथी आणि १५ हजार एचआयव्ही संसर्गितांना दिलासा मिळणार

सोलापूर/प्रतिनिधीः श्री. छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचर रुग्णालयातील बाह्य रुग्ण कक्ष (ओपीडी) ५९ येथील कोरोना काळात बंद झालेला सिंगल विंडो टीजी हेल्प डेस्क(तृतीयपंथी मित्र मदत केंद्र)चे उदघाटन अधिष्ठता डॉ. सुधीर देशमुख यांच्या हस्ते झाले. तृतीयपंथी व एचआयव्ही संसर्गितांना मदतीचा हात मिलिंद म्हैसकर (सार्वजनिक आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव) यांच्या संकल्पनेतून व डॉ.प्रसाद भंडारी (अतिरिक्त प्रकल्प संचालक, MS-CS, Mumbai ) यांच्या मार्गदर्शन खाली महाराष्ट्रातील सोलापूर मध्ये पहिल्या TG तृतीयपंथी मित्र मदत केंद्राची सुरवात.

सोलापूर जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग आणि महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था यांच्या वतीने टीजी हेल्प डेस्क (तृतीयपंथी मित्र मदत केंद्र) आजपासून सुरू होत आहे. कोरोना काळात बंद झालेला हेल्प डेस्क नव्याने आजपासून सुरू होत असून जिल्ह्यातील २०१ तृतीयपंथी आणि १५ हजार एचआयव्ही संसर्गितांना दिलासा मिळाल्याची माहिती जिल्हा कार्यक्रम अधिकारी भगवान भुसारी यांनी दिली.

सर्व एचआयव्ही संसर्गितांना आणि तृतीयपंथियांना आयुष्मान भारत योजनेंतर्गत कार्ड करुन दिले जाणार आहेत. आजच्या दिवशी ३५ तृतीयपंथीचे आयुष्मान भारत कार्ड काढण्यात आले. याबरोबरच एचआयव्हीसह जगणा-यांना जीवन कौशल्य कार्यक्रम (दिशा एक जगण्याची कला) राबविला जात असून त्याची सुरूवात शुक्रवारपासून होत आहे. त्वचा आजार, आहार-विहार, महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना असे उपक्रम राबविले जात आहेत. सार्वजनिक आरोग्य विभागाचे अतिरिक्त मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद, अधिष्ठता सुधीर देशमुख, शल्य चिकित्सक डॉ. डी. के. पाटील, वरिष्ठ वैद्यकीय अधिकारी अग्रजा चिटणीस यांच्या मार्गदर्शनाखाली विविध योजनांचा टीजी हेल्पडेस्क सेंटर अंतर्गत शुभारंभ झाला. अधिष्ठाता डॉ. देशमुख यांनी या सेंटर चे महत्व सांगितले व या सेंटर मधून सर्व तपासणी व उपचार मोफत असल्याचे सांगितले तसेच या सेंटर मधून समुपदेशन करण्यात येणार असल्याची माहिती दिली. तसेच या



केंद्रातील आजारी रुग्णाकरीता ६ खाट आरक्षित ठेवण्यात आले आहेत अशी माहिती दिली. तसेच आरोग्य पूर्ण जीवन जगण्यासाठी एक खिडकी कार्यक्रम अंतर्गत तृतीयपंथी मित्र मदत केंद्रांना भेट देण्याचे आवाहन केले.

# एसएनडीटी महिला विद्यापीठासाठी ५० एकर जमीन प्रदान

## ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्याला यश

चंद्रपूर : श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठासाठी (एस.एन.डी.टी.) ५० एकर जमीन उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासंदर्भातील शासन निर्णय शुक्रवारी जारी करण्यात आला. विशेष म्हणजे शासन निर्णयाची प्रत महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीच राज्याचे वने व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे स्वतः सुपूर्द केली. एस.एन.डी.टी. विद्यापीठासाठी जमीन उपलब्ध करून दिल्याबद्दल पालकमंत्री श्री. मुनगंटीवार यांनी महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले आहेत. मौजा विसापूर, ता. बल्लारपूर येथील सर्वे क्रमांक ४६६ मधील महापारेषण कंपनीच्या ताब्यातील भुसंपादीत जमिनीपैकी ५० एकर भुसंपादीत जमीन एस.एन.डी.टी. विद्यापीठाला प्रदान करण्यात आली आहे. एस.एन.डी.टी. विद्यापीठासाठी जमीन उपलब्ध व्हावी, यासाठी पालकमंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. अखेर त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून ५० एकर जमीन उपलब्ध करून देण्यात आली आहे.

नेताजी सुभाषचंद्र बोस डिजीटल मुलींची शाळा, बल्लारपूर येथे श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई यांच्या माध्यमातून महर्षी कर्वे महिला सक्षमीकरण ज्ञानसंकुलाचे लोकार्पण १० जून २०२३ रोजी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते करण्यात आले होते. १०७ वर्षांपूर्वी म्हणजेच सन १९१६ मध्ये एस.एन.डी.टी. विद्यापीठाची स्थापना झाली. महर्षी कर्वे यांनी घरोघरी जाऊन दरमहा एक रुपया गोळा करून विद्यापीठाला सक्षम केले. पहिले कॅम्पस पुणे येथे सुरू झाले. त्यानंतर मुंबई, श्रीवर्धन व चंद्रपूरमध्ये ज्ञानसंकुल सुरू करण्यात आले आहे.

या विद्यापीठाच्या माध्यमातून महिलांना कौशल्यपूर्ण शिक्षण मिळण्यासाठी तसेच महिलांचे ख-या अर्थाने सक्षमीकरण करण्यासाठी पालकमंत्री श्री. मुनगंटीवार आग्रही होते. ६४ प्रकारचे कौशल्यपूर्ण अभ्यासक्रम या विद्यापीठाच्या माध्यमातून देण्यात येत असून विद्यापीठाच्या निर्मितीसाठी कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव यांनी तसेच त्यांच्या टीमने सातत्याने चंद्रपूरमध्ये भेटी दिल्या. बल्लारपूर-विसापूर मार्गावर ५० एकर जागेमध्ये ५६० कोटी रुपये खर्च करून, राज्यातीलच नव्हे तर देशातील महिलांना गौरव वाटेल, असे अप्रतिम विद्यापीठ तयार करण्यात येत आहे. ज्यांनी महिलांचा सन्मान वाढविला त्या सर्वांच्या ज्ञानाचा दीपस्तंभ प्रतिकाच्या रूपामध्ये त्या संकुलात लावण्यात येणार आहे. तसेच थोर महिलांची मार्गदर्शक मूल्ये पुतळ्यासह लावण्याची व्यवस्था देखील करण्यात येणार आहे. महिलांच्या पारंपारिक खेळांसाठी वातानुकुलीत इनडोअर स्टेडियम येथे उभारण्यात येईल.

# अण्णा भाऊ साठे स्मारकासाठी दिलीप धोत्रेंकडून दहा लाखांची देणगी जाहीर

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपुरात लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि विठ्ठल परिवाराच्यावतीने शिवतीर्थ येथे तीर्थक्षेत्र पंढरपूर स्वच्छ आणि निरोगी ठेवणाऱ्या महिला सफाई कामगारांचा संपूर्ण पोशाख देऊन सन्मान करण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप देखील करण्यात आले. या कार्यक्रमात दिलीप धोत्रे यांनी अण्णा भाऊ साठे स्मारकासाठी १० लाखांची देणगी जाहीर केली.



मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी आयोजित केलेल्या या कार्यक्रमास सोलापूरचे माजी पालकमंत्री लक्ष्मणराव ढोबळे, विठ्ठल साखर कारखान्याचे अध्यक्ष अभिजित पाटील,जयंत भंडारे, दिलीपराव देवकुळे, माजी नगरसेवक नागेश भाऊ यादव, सुधीर धोत्रे, संजय बंदपट्टे, लखन चौगुले, जयवंत भोसले, संतोष कवडे, सागर देवकुळे, गुरु दोडिया, किशोर खिलारे, गणेश पिंपळनेरकर यांच्यासह शेकडो महिला सफाई कामगार, पदाधिकारी उपस्थित होते. तीर्थक्षेत्र पंढरी स्वच्छ सुंदर ठेवण्यासाठी अहोरात्र कष्ट घेणाऱ्या सफाई कामगारांचा सन्मान करून मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी समाजातील दुर्लक्षित घटकाला मुख्य प्रवाहात आणण्याचे कार्य केले आहे. आजही सफाई कामगारांचे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. त्यांना अद्याप हक्काचे घर मिळाले नाही. या सर्व प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आपल्याला एकत्र येणे गरजेचे असल्याचे आवाहन ढोबळे यांनी केले.गेली पंधरा वर्षे झाले साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पुतळ्याचा प्रश्न मार्गी लागला नाही. स्व. आमदार भारत भालके यांनी सात वर्षांपूर्वी अण्णा भाऊ साठे यांचा पुतळा तयार करून दिला आहे. मात्र, तो अद्याप बसवून देण्यात आलेला नाही. पंढरपूर नगरपालिकेच्या सत्ताधाऱ्यांकडे लोकशाहीर यांचा पुतळा बसवण्याची इच्छाशक्ती नाही, असे मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी सांगितले.

येथील लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या पुतळ्याचा प्रश्न अनेक वर्ष झाले प्रलंबित असून स्मारक उभे करण्यासाठी दिलीप धोत्रे यांनी दहा लाख रुपये देणगी देण्याचे जाहीर केले. तसेच सर्व अनुयायांना घेऊन एका वर्षात नियोजित ठिकाणी अण्णा भाऊ साठे यांचे यथोचित स्मारक उभारण्यात येईल आणि त्याच ठिकाणी पुढील वर्षी अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करू अशी ग्वाही दिली.